## -प्रकरण दुसरे-

### // द.ता.भोसले यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा परिचय //

पहिल्या प्रकरणात ग्रामीण कथेची वाटचाल आपण पाहिली. या पार्श्वभूमीवर द.ता.भोसले यांच्या 'पाळत' व 'पाऊस' या कथासंग्रहाच्या आधारे त्यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये आपण पाहणार आहोत. तत्पूर्वी द.ता.भोसले यांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्वाची ओळख करुन घेणे अगत्याचे आहे.

द.ता.भोसले यांचे गाव पंढरपूर तालुक्यातील सरकोली. आई वडील निरक्षर व अल्पभूधारक होते. म्हणून कुटुंबाची उपजीविका शेत-मजुरीवर चालत असे. मात्र आई वडिलांचे शिक्षणावर अतिशय प्रेम होते. हे दोघे भाऊ व दोघी बहिणी. बहिणी अकाली मरण पावल्या. भाऊ पदवीधर असून शेतीव्यवसाय करतो. आईवडील कष्टाळू व सरळमार्गी, सचोटीचे आणि सेवाभावी वृत्तीचे होते. लेखकाच्या वयाच्या अकराव्या वर्षी ते वर्षभराच्या अंतराने वारले. बालपण सरकोली या खेड्यागावी गेले. आईवडील व प्राथमिक शाळेतील काही शिक्षक यांचे लेखकावर उत्तम संस्कार झाले. माध्यमिक शिक्षण सांगोला विद्यामंदीर सांगोला येथे झाले. या काळात बापूसाहेब व राजाभाऊ झपके या शिक्षकांचे खोलवर संस्कार झाले. तसेच थोरामोठ्यांच्या चरित्र वाचनातून लेखकाला मोलाचे संस्कार लाभले.

लेखकाचे बी.ए.पर्यंतचे शिक्षण संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे झाले. डॉ.निर्मलकुमार फडकुले,डॉ.दु.का.संत यांच्या अध्यापनाचा लाभ मिळाला. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नव्हते. हे सगळे जिल्हे पुणे विद्यापीठाच्या कक्षेत येत होते. त्यावेळी बी.ए.च्या परीक्षेत मराठी विषयात लेखकाने प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक मिळविले. एम्.ए.मराठीचे शिक्षण लेखकाने पुणे विद्यापीठात पूर्ण केले. डॉ.शं.गो.तुळपुळे,डॉ.पु.ग.सहस्त्रबुद्धे,प्रा.श्री.के.क्षीरसागर या गुरुजनांचा सहवास लाभला. एम्.ए.च्या परीक्षेत उत्तम गुण त्यांनी मिळविले. जून १९६२ पासून लेखकाने मराठीचे प्राध्यापक म्हणून श्रीरामपूरच्या बोरावके महाविद्यालयात अध्यापनास प्रारंभ केला. १९९६ साली ते पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातून उपप्राचार्य म्हणून निवृत्त झाले.

आपल्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत वरील दोन महाविद्यालयाखेरीज छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, बळवंत महाविद्यालय, विटा व आण्णासाहेब आपटे महाविद्यालय, मंचर या ठिकाणी प्राध्यापक म्हणून काम केले.

द.ता.भोसले यांचा १९६३ साली कु.सरला गणपतराव मोरे यांच्याशी विवाह झाला. त्या एम्.ए.बी.एड्. असून पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयात मराठीच्या प्रमुख म्हणून काम करीत आहेत. लेखकाने अध्यापनाबरोबर सामाजिक बांधीलकीच्या भावनेने गरीब, होतकरू अशा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. अनेक गरजूंना मदत केली. त्यापाठीमागे त्यांच्या पत्नीची प्रेरणा महत्त्वाची आहे. त्यांना डॉ.मुकुल नावाचा एक मुलगा असून त्याने वैद्यकीय क्षेत्रातले एम्.डी.हे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. पंढरपूर शहरात एक निष्णात व गरीबांचा डॉक्टर म्हणून त्याने नावलौकिक मिळवलेला आहे. लेखकाची सून सौ.अंजली ही ही डॉक्टर असून एका निष्ठेने वैद्यकीय व्यवसाय करीत आहे.

सेवानिवृत्तीच्या काळातही आपल्या दोन नातवंडात रमणारे लेखक, सतत भेटावयास येणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापक व सामाजिक कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करतात. त्यातूनच वेळ काढून आपले लेखन करतात. द.ता. भोसले यांचा स्वभाव सौम्य, शांत व मनमिळावू आहे. कोणतेही काम करताना ते काम उत्कृष्ट व्हावे याचा त्यांना ध्यास लागलेला असतो. मग ते अध्यापनाची वा एखाद्या व्याख्यानाची तयारी करणे असो अथवा नियतकालिकाचे संपादन करणे असो. एका निष्ठेने, तटस्थपणे त्यांनी आपला प्रपंच आणि लेखन प्रपंचही सांभाळलेला आहे.

प्राध्यापक म्हणून काम करताना त्यांनी सखोल अध्ययन करून अध्यापन केले. विभागप्रमुख म्हणून काम पाहताना आपल्या विभागातील प्राध्यापकांच्या कामाचे योग्य नियोजन करणे, त्यांना मार्गदर्शन करणे ही त्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य सांगताना

डॉ.पंडित टापरे म्हणतात, "परिसर ग्रामीण असो वा शहरी तेथील सांस्कृतिक जीवनावर सरांनी आपल्या कुशल अध्यापनाने व प्रभावी वक्तृत्वाने एक अमिट मुद्रा उमटवली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या मित्र मंडळीशी मिस्किलपणे बोलत त्यांना कार्यप्रवृत्त करावयाचे. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास अप्रत्यक्ष मदत करावयाची. प्रा.एम्.ए.शेख,प्रा.एम्.के.यादव,डॉ.र.बा.मंचरकर,डॉ.वसंतराव मोरे अशा कितीतरी सुहृदयांना याचा सुखद प्रत्यय आला आहे." १

विद्यापीठ पातळीवर मराठी अभ्यास विषयाचे अनेक वर्षे ते सदस्य होते. व अनेक वेळा अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. ते अध्यक्ष होते त्या काळातील १९८० साली त्यावेळचे मराठी विभागाचे प्रमुख डॉ.गो. मा.पवार यांनी 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप' हा ऐतिहासिक परिसंवाद घेतला. व पॉप्युलर प्रकाशन, मुंबई यांनी याच नावाने डॉ.गो.मा.पवार व प्राध्यापक म.द.हातकणंगलेकर यांच्या संपादकत्वाखाली हा ग्रंथ प्रसिध्द केला.

द.ता.भोसले यांनी वर उल्लेख केलेल्या ज्या ज्या महाविद्यालयात काम केले तेथील नियतकालिकाचे साक्षेपी संपादन केले. सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजात काम करताना 'रयत शिक्षण पत्रिका' या नियतकालिकाचे अनेक वर्षे संपादन केले. त्या कालखंडातील प्रसिध्द विचारवंत के.रा.ना. चव्हाण यांच्यासारख्यांच्या लेखाचे साक्षेपी संपादन केले. तसेच अनेक शाखा, महाविद्यालयात, विविध परिषदातून व्याख्याने दिली. अनेक परिसंवादात वक्ते म्हणून व अध्यक्ष म्हणून आपले योगदान दिले.

द.ता.भोसले यांनी ग्रामीण साहित्य चळवळीतही महत्वाचे योगदान दिलेले आहे. त्या संदर्भात ते म्हणतात -

" पहिल्या मेळाव्यापासून मी या चळवळीत सहभागी आहे. माझा या चळवळीशी आलेला संबंध व्दिविध स्वरूपाचा होता. तो म्हणजे शिकण्याचा व आपणाला जे ठाऊक आहे ते सांगण्याचा. ग्रामीण चळवळीचा उदय जेव्हा झाला, त्या काळापर्यंत माझी चारदोन पुस्तके प्रसिध्द झाली होती. किरकोळ स्वरूपाचे लेखन प्रसिध्द होत होते. तरीही त्यात समाधान

नव्हते. आपल्या लिखाणात त्रुटी आहेत याची जाणीव मनाला होत होती; पण त्या कोणत्या आहेत, त्या कशाप्रकारे दूर कराव्या या विषयाची जाणीव होत नव्हती. उपाय सापडत नव्हता.......मराठी आणि इंग्रजीतील चांगल्या साहित्याचे भरपूर वाचन करीत असलो तरी साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेविषयी कलात्म जाणीव प्राप्त होत नव्हती. आपल्याकडील समीक्षा ग्रंथाही या अडचणींचे निराकरण करणाऱ्या स्वरूपाचे नसतात. हे आपण जाणतोच. लेखन निर्मितीच्या संदर्भातील त्रुटी कमी करण्याचा चांगला उपाय म्हणजे जाणकारांशी केलेल्या चर्चा व त्यांची या संदर्भातील व्याख्याने हाच असतो. ग्रामीण साहित्याच्या मेळाव्यामध्ये अगदी प्रारंभापासून सक्रीय सहभागी होण्यामागे माझा हा हेतू होता." [२]

द.ता.भोसले यांच्या प्रकाशित ग्रंथरूप साहित्यात पुढील लेखनाचा समावेश होतो.

त्यांचे 'अन्न', 'पाळत', 'अग अग म्हशी', 'पाऊस' व 'मनस्विनी' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत, तसेच 'इथे फुलांना मरण जन्मता' व 'मी आणि माझा बाप' या कादंबऱ्यात प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांच्या ललित गद्य लेखनात 'पार आणि शिवार' व 'आठवणीतला दिवस' या दोन लेखसंग्रहांचा समावेश होतो. तर चरित्रामध्ये 'महात्मा फुले : एक चिंतन', 'कुमारांचे कर्मवीर' या पुस्तकांचा समावेश होतो. त्यांच्या संपादनात 'ज्ञानेश्वरी अध्याय १ला', 'सौंदर्यकुंज', 'विष्णूशास्त्री चिपळूणकर-निबंधमालेतील तीन निबंध' हा वैशिष्टयपूर्ण संपादने आहेत.

या लेखनापैकी प्रथम कथेचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. त्यांच्या प्रकाशित पाच कथासंग्रहांपैकी 'पाळत' व 'पाऊस' या कथासंग्रहांचा सविस्तर अभ्यास करावयाचा असल्याने त्यांचा येथे विचार केलेला नाही, 'अन्न', 'अग अग म्हशी' व 'मनस्विनी' या तीन कथासंग्रहांचा विचार केलेला आहे.

'अन्न'[३] हा लेखकाचा पहिला कथासंग्रह. हा कथासंग्रह लेखकाने आपल्या दिवंगत मातापित्यांना अर्पण केलेला आहे.

भूक- मग ती अन्नाची असो वा वासनेची : सारे मानवी जीवन त्यामध्ये घोटाळते आहे. ही कथासंग्रहाच्या सुरुवातीची वाक्ये. हेच आशयसूत्र या कथासंग्रहाच्या १९ कथांतून आविष्कृत झालेले आहे. या कथात 'मोबदला', 'दान', 'गौतमी', 'हाथ', 'पूर', 'लहरीविचार', 'प्रवास,' 'लहरीविचार दोन,' 'भूक,' 'अग अग म्हशी', 'व्यवस्थात,' 'करामत,' 'सोबत,' 'राग,' 'इसापा', 'याचे नाव कायदा,' 'किंमत,' 'अन्न' या कथांचा समावेश होतो. ग्रामीण जीवनातील सुखाद-दु:खाद असे विविध अनुभव या कथांतून आपणाला भेटतात. ग्रामीण वास्तवाचे एक वेगळे दर्शन या कथांतून घडते.

'अग अग म्हशी' [४] या कथासंग्रहात सामान्यांच्या जीवनातील साधे साधे भावानुभाव विनोदाच्या साहय्याने आविष्कृत झालेले आहेत. यातील भावानुभाव हे शेतमजूर, सालगडी, कष्टकरी, बलुतेदार, हातावर पोट भरणारे स्त्रीपुरुष यांच्या जीवनातील आहेत.

'मनस्विनी' [५] या कथासंग्रहात एकूण अठरा कथा आहेत. त्यामध्ये 'मनस्विनी', 'मासोळी', 'सांजावताना', 'दोघी', 'शिकार', 'प्रकाश पावले', 'ओझे', 'काटेरी आकाश,' 'कौल,' 'पाणी,' 'मूकनायिका,' 'शास्त्रीजी', 'वाटणी,' 'अभिषेक,' 'कमाई,' 'पताका,' 'अन्नदान' व 'सवाल' या कथांचा समावेश होतो. मानवी जीवनातील दु:ख, दारिद्र्य व वेदना यांचे चित्रण करणाऱ्या या कथा आहेत. या कथासंग्रहाची अर्पणपत्रिका पुढीलप्रमाणे आहे.

" सांगोला विद्या मंदिर या शाळा माऊलीस - या माऊलीने मला जीवनासाठी खूप काही दिले" अशी आहे.

'मनस्विनी' या कथासंग्रहा कुर्डुवाडीच्या शिवगिरिजा प्रतिष्ठान यांच्यावतीने देण्यात येणारा कै. सदाशिव नारायण कदम गुरुजी १९९७चा वाङ्मय पुरस्कार मिळाला आहे.

'मी आणि माझा बाप' व 'इथे फुलांना मरण जन्मता' या दोन कादंबऱ्या द. ता. भोसले यांनी लिहिल्या. यापैकी 'मी आणि माझा बाप' [६] ही कादंबरी ग्रामीण विनोदी कादंबरी आहे. तिची एकूण नऊ प्रकरणे

आहेत. खुशालचेंडू असणारा बाप खेड्यात कष्ट न करता कसे जगतो, नातेवाईकांना कसे फसवतो, विधुर असल्याने लफडी कशी करतो, गावक-यांना टोप्या कशा घालतो, याचे प्रत्ययकारी दर्शन या कादंबरीतून घडते. ग्रामीण भाषेतील संवाद व प्रमाण भाषेतील निवेदन यांचा योग्य मेळ घालण्यात आलेला आहे. ही कादंबरी लेखकाने आचार्य अत्रे व पु.ल.देशपांडे यांच्या विनोदी साहित्यास अर्पण केलेली आहे.

'इथे फुलांना मरण जन्मता'[७] ही कादंबरी कुलकर्णी ग्रंथागाराच्या रौप्यमहोत्सवी कादंबरी योजनेखाली प्रसिध्द झालेली आहे. मुक्तीपंथाचे अनुयायी असणा-या रमा नावाच्या तरुण मुलीची शोकांतिका या कादंबरी-तून रंगवलेली आहे. या कादंबरीत एकूण नऊ प्रकरणे आहेत. कथानकाची नीटस गुंफण, वेधक व्यक्तिचित्रे, ओघवती भाषाशैली ही या कादंबरीची प्रमुख वैशिष्टये आहेत.

'पार आणि शिवार'[८] हा द.ता.भोसले यांच्या ललित लेखांचा संग्रह आहे. ग्रामीण जीवनातील नित्याच्या दैनंदिन जीवनातील सुख — दुःखाचे चित्रण त्यांनी केलेले आहे.

'आठवणीतला दिवस'[९] हा द.ता.भोसले यांच्या ललित लेखांचा संग्रह आहे. 'आठवणीतला दिवस' या शीर्षकाखाली दैनिक तरुण भारत (सोलापूर) मध्ये लेखकाने एक वर्षभर सदर चालवले होते. त्या सदरातील सदोतीस निवडक ललित लेखांचा हा संग्रह आहे. ग्रामीण जीवनातील दुष्काळ,दारिद्र्य,सण,आरोग्यसेवा,फळांच्या बहराचे दिवस, खेड्यातील शिक्षण, विविध व्यवहार यांचे ललितरम्य शैलीत लेखकाने दर्शन घडविले आहे. या लेखसंग्रहाची प्रस्तावना देखील मार्मिक आहे.

" ज्या विद्यालयाने जीवनाची दिशा दाखविली व जीवनासाठी संस्कार - शिदोरी दिली त्या सांगोला विद्यामंदीर या प्रशालेस सादर अर्पण." अशी आहे. ग्रामीण ललित लेख या वाङ्मय प्रकारातील हा महत्त्वाचा ललितलेख संग्रह आहे.

द.ता.भोसले यांच्या समीक्षा लेखांचा 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन'[१०] हा पहिला समीक्षा लेखसंग्रह आहे. या लेखसंग्रहात बारा लेख आहेत. त्यामध्ये ग्रामीण साहित्य, ग्रामीण लेखक, ग्रामीण अभिरुची, विनोद इत्यादी विषय आलेले आहेत, त्याचप्रमाणे धनगरी ओव्या, शाहिरी कविता याविषयी लेखकाने केलेले विवेचन समाविष्ट करण्यात आलेले आहे.

हा ग्रंथ " सन्मित्र प्रा.आनंद यादव यास
आपल्या दोन तपांच्या
निकोप स्नेहबंधास "
अर्पण केलेला आहे.

'महात्मा फुले : एक चिंतन'[११] या चरित्रग्रंथात महात्मा फुले यांच्या कार्य कर्तृत्वाचा आढावा घेण्यात आलेला आहे. म.फुले यांनी नागर संस्कृती व नागर संस्कृती यांच्यातील विषमता दाखवली. ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना स्वातंत्र्य,समता,बुध्दीवाद यांचा स्पर्श झाला नव्हता. त्यांच्या मनात नव्या जाणीवा म.फुल्यांनी निर्माण केल्या. या कार्याचे महत्त्व द.ता.भोसले यांनी विशद केले आहे.

'कुमाराचे कर्मवीर'[१२] हा कुमारवयातील मुलांसाठी लिहिलेला कर्मवीर भाऊराव पाटील यांचा चरित्रग्रंथ आहे. एक्केचाळीस छोट्या छोट्या प्रकरणात कर्मवीरांच्या जीवनचरित्राचा ठळक घटनांच्या आधारे आढावा घेण्यात आलेला आहे. प्रसंग कथन करण्याची कलात्मकता, मार्मिक संवाद, काही वाक्यांतून व्यक्तिचित्रे उभे करण्याचे कौशल्य व सुबोध भाषा ही या चरित्राची महत्त्वाची वैशिष्टये आहेत.

'ज्ञानेश्वरी अध्याय १ ला'[१३]

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी द.ता.भोसले यांनी परिश्रमपूर्वक हा अध्याय संपादित केला आहे. ज्ञानेश्वराचे चरित्र, तत्कालीन समाजस्थिती, ज्ञानेश्वरांची ग्रंथसंपदा, कवी म्हणून ज्ञानेश्वरांची थोरवी, पहिल्या अध्यायाचा भावार्थ इत्यादी मुद्यांच्या आधारे या ग्रंथाची प्रस्तावना सिध्द केलेली आहे. तसेच प्रत्येक ओवीतील कठीण शब्दाचे अर्थ, अर्वाचीन

मराठीत भावार्थ व शेवटी विवेचक टीपा दिलेल्या आहेत. हे संपादन विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वरीचे इतर अध्याय अभ्यासास साहाय्य करणारे असेच झालेले आहे.

'सौंदर्यकुंज'[१५]

ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. ना. अदवंत यांच्या सहकार्याने आधुनिक मराठी कवींच्या निवडक व लक्षणीय कवितांचा हा संपादन संग्रह आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आधुनिक मराठी कवितेची ओळख करून देण्याच्या दृष्टीने या संग्रहाची रचना करण्यात आलेली आहे. या संग्रहात बी, बालकवी, माधव जूलियन, बा. भ. बोरकर, इंदिरा संत व मंगेश पाडगावकर यांच्या कविता निवडण्यात आलेल्या आहेत. या संग्रहास छत्तीस पानांची प्रस्तावना असून शेवटी टीपा जोडलेल्या आहेत.

'विष्णुशास्त्री चिपळूणकर - निबंध मालेतील तीन निबंध'[१५] :-

या निबंधांची विद्यापीठीय आवृत्ती द. ता. भोसले यांनी संपादित केलेली आहे. या निबंधात 'विद्वत्व आणि कवित्व', 'इतिहास' व 'आमच्या देशाची स्थिती' या तीन निबंधांचा समावेश करण्यात आलेला आहे. या संग्रहास सत्याऐंशी पानांची विवेचक प्रस्तावना जोडण्यात आलेली आहे. शेवटी टीपा आणि शब्दार्थ देण्यात आलेले आहेत.

द. ता. भोसले यांनी स्फुट लेखन बरेचसे केले आहे. अभ्यासकाला त्यातील जे उपलब्ध झाले त्या आधारे त्यांच्या स्फुट लेखनाचा आढावा घेतलेला आहे. समीक्षणात्मक व ग्रंथपरीक्षणपर, असे स्थूलमानाने त्यांच्या या लेखनाचे स्वरूप आहे. समीक्षणात्मक लेखनात पुढील लेखांचा समावेश आहे.

१) 'आता महाराष्ट्र साहित्य महामंडळाने काय करायला हवे' - 'दैनिक मराठा', रविवार पुरवणी - दिनांक २१ मार्च १९६५.

२) 'वा. लं. ची साहित्यसमीक्षा' - 'दैनिक मराठा', रविवारची पुरवणी २६ डिसेंबर ६५.

३) 'ग्रामीण मराठी कथेतील विनोद व उपरोध' - 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' - एप्रिल - जून १९७९.

४) 'कविता रसिकता आणि संस्कार' - 'ललित' - जुलै १९८३.

५) 'वाचकांची वाङ्मयीन सोय' - 'ललित' - जानेवारी ते जून १९८४

६) 'महाराष्ट्र कवी यशवंत : एक स्मरण,' 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' जानेवारी ते मार्च १९८६.

७) 'काव्यानुभवाच्या पुनरावृत्तीची कारणे' - 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' जुलै ते सप्टेंबर १९८९.

साधारणपणे १९६५ च्या दरम्यान महाराष्ट्र साहित्य महामंडळ स्थापन झाले. या मंडळाखाली महाराष्ट्राच्या विविध भागात काम करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ इत्यादी संस्था एकत्र आल्या. या महामंडळाने विविध वाङ्मयीन मासिकांना मदत केली पाहिजे. नव्या होतकरु तरुण लेखकांना मार्गदर्शन केले पाहिजे. मध्ययुगीन मराठी साहित्याचे जे अभ्यासक आहेत त्यांची परंपरा पुढे चालू राहावी म्हणून मार्गदर्शन केले पाहिजे आणि मराठीतील उत्कृष्ट ग्रंथांच्या हिंदीप्रमाणे पॉकेट एडिशन्स काढल्या पाहिजेत अशी मते मांडलेली आहेत.

'वा.लं.ची साहित्यसमीक्षा' या लेखात हैद्राबाद येथे भरलेल्या ४६ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वा.ल.कुलकर्णी यांच्या समीक्षा-पध्दतीचा आढावा घेतला आहे. वा.लं.नी नव्या साहित्यासाठी नवी समीक्षा पध्दती निर्माण केली. तसेच आपल्या समीक्षेतून कलाकृतीच्या चैतन्याचा व सौंदर्याचा वेध घेतला. साहित्यावरील उदंड प्रेम, मार्गदर्शकाची भूमिका होती. वा.लं.च्या लेखनाची वैशिष्टये आहेत असे द.ता.भोसले यांनी मांडले आहे.

'ग्रामीण मराठी कथेतील विनोद व उपरोध' या लेखात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा.मिरासदार, रा.रं.बोराडे, आनंद यादव 'यांच्या ग्रामीण कथेतील विनोद व उपरोध' यांची वैशिष्टये नोंदवली आहेत. तसेच ग्रामीण जीवनाचा आविष्कार करणारे विनोद हे साधन

की साध्य यासारख्या प्रश्नांचाही उहापोह केलेला आहे. तसेच ग्रामीण जीवनानुभव व्यक्त करताना उपहासाचेही दर्शन कसे घडते हेही विस्ताराने मांडलेले आहे.

'कविता, रसिकता आणि संस्कार' या लेखात लहानपणी शिक्षकाने कवितेचे नीटपणे अध्यापन न केल्याने क्रियापद शेवटी नसलेली गद्यरचना म्हणजे कविता एवढाच एक संस्कार लेखकाच्या मनावर झालेला होता; पण पुढे तो संस्कार बदलला. आजच्या साहित्यविश्वाचे लेखकाचे निरीक्षण मार्मिक आहे हे एकीकडे कवी वाढतायेत आणि दुसरीकडे कविताप्रेमी घटताहेत हे कोडे मात्र बुचकळ्यात टाकणारे वाटते. या विधानावरून आपणास पटते.

'वाचकांची वाङ्‌मयीन सोय' या लेखात दिवाळी अंकाविषयी काही निरीक्षणे नोंदवलेली आहेत. रद्दीवाले, किराणा मालाचे, दुकानदार, प्रेसवाले ही मंडळी दिवाळी अंकाकडे किती उपेक्षेने पाहतात हे लेखकाने नोंदवले आहे. सामान्य वाचकाच्या दृष्टीने एकाचवेळी सर्व वस्तूंच्या झकास जाहिराती व देखण्या शेकडो स्त्रियांची चित्रे दिवाळी अंकातून पाहावयास मिळतात असे लेखक म्हणतात. थोडक्यात मौलिक साहित्य काही दिवाळी अंकातून पाहावयास मिळत नाही.

'महाराष्ट्र कवी यशवंत : एक स्मरण' या लेखात यशवंतांच्या काव्य कर्तृत्वाचा आढावा घेतलेला आहे. सामान्य माणसाच्या सुखादु:खाचे चित्रण, जुन्या आणि नव्या काव्यविषयक जाणीवांचा मिलाफ, उदासीनता व निराशा या यशवंतांच्या काव्य वैशिष्टयांचा आढावा घेतलेला आहे.

'काव्यानुभवाच्या पुनरावृत्तीची कारणे' या लेखात एखादा कवी एकाच विषयावर दोन तीन कविता लिहितो म्हणजेच काव्यानुभवाची पुनरावृत्ती होते. त्याची कारणे कोणती असावीत, याचा विचार करताना काव्येतर प्रेरणेचा प्रभाव, मर्यादांची जाणीव, अनुभवाचे विराट रूप, लोकमान्य पारंपरिक आकृतिबंध, लेखकाचे वाङ्‌मयीन वय इत्यादी कारणांचा उहापोह केलेला आहे.

त्यांच्या ग्रंथपरीक्षणपर लेखात पुढील लेखांचा समावेश होतो.

१) 'संध्याकाळच्या कविता- एक चिंतन' - 'नवभारत' फेब्रुवारी ते जून ७३

२) 'पानीपत - विश्वास पाटील,' 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' - जानेवारी ते मार्च ८१.

३) 'विनोदी कथा- वि.वा.शिरवाडकर' - 'सकाळ' रविवार १४एप्रिल १९९६.

'संध्याकाळच्या कविता एक चिंतन' - ग्रेस कवींच्या संध्याकाळच्या कविता या काव्यसंग्रहाचे परीक्षण करताना गूढता, धूसरता व दुःखाची तीव्रता ही ग्रेसची वैशिष्टये लेखक मांडतात. ग्रेसचे जीवनचिंतन तसेच पारलौकिक व परिपूर्ण जीवनाचा कवीला लागलेला ध्यास याचेही चित्रण येते.

विश्वास पाटील यांच्या 'पानीपत' या कादंबरीचे परीक्षण करताना एक भव्य साक्षात्कार असा गौरवपूर्ण उल्लेख या कादंबरीचा लेखक करतात तसेच ऐतिहासिक वातावरणाचा प्रत्यय देणारी भाषा, अर्थवाही व मार्मिक संवाद,तटस्थता, कालपटाचा समन्वय साधण्याची वृत्ती इत्यादी वैशिष्टये लेखकाने नोंदवली आहेत.

शिरवाडकरांच्या या विनोदी कथा शिरवाडकरांचे समाज जीवनाचे निरीक्षण, त्यांच्या स्वभावातील मिस्किलता कशी स्पष्ट करतो हे लेखकाने मांडले आहे तसेच शिरवाडकरांच्या प्रसंगनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ विनोदाची वैशिष्टये सांगितली आहेत. थोडक्यात द.ता.भोसले यांचे लेखन विपुल आहे, तसेच त्यांच्या लेखनात सातत्य आहे असे जाणवते.

या प्रकरणात आपण जन्म,बालपण,शिक्षण,विवाह,करिअर, स्वभावविशेष,परिसंवाद,संमेलने,ग्रामीण साहित्य चळवळ इत्यादीतील सहभाग तसेच लेखन या घटकांच्या आधारे द.ता.भोसले यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करुन घेतला.

=-=-=-=-=

प्रकरण - दुसरे - संदर्भ :-


१) पंडित टापरे, 'दैनिक संचार,' सोलापूर, २३ जुलै १९९५.

२) द.ता.भोसले, 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही,' पुणे १९९६ पृ.७३.

३) द.ता.भोसले, 'अन्न,' कोल्हापूर, १९७६.

४) द.ता.भोसले, 'अग अग म्हशी,' पुणे

५) द.ता.भोसले, 'मनस्विनी,' पुणे, १९९५

६) द.ता.भोसले, 'मी आणि माझा बाप,' पुणे, १९६९.

७) द.ता.भोसले, 'इथे फुलांना मरण जन्मता,' पुणे, १९७०.

८) द.ता.भोसले, 'पार आणि शिवार,' पुणे, १९८८.

९) द.ता.भोसले, 'आठवणीतला दिवस,' पुणे, १९९६.

१०) द.ता.भोसले, 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन,' पुणे, १९८८.

११) द.ता.भोसले, 'महात्मा फुले : एक चिंतन,' पुणे,

१२) द.ता.भोसले, 'कुमाराचे कर्मवीर,' सातारा, १९८७.

१३) द.ता.भोसले, 'ज्ञानेश्वरी अध्याय १ला,' सातारा, १९६५.

१४) म.ना.अदवंत, द.ता.भोसले, 'सौंदर्यकुंज,' पुणे, १९७१.

१५) द.ता.भोसले, 'विष्णुशास्त्री चिपळूणकर - निबंध मालेतील तीन निबंध,' सातारा, १९७५.


=-=-=-=-=